## सुरक्षा रक्षक पदाची मागासवर्गीय आणि खुल्या प्रवर्गाची
## पदाची रिक्त पदे भरण्यासाठी भरती मोहिम

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजा/भज, विमाप्र, इमाव आणि खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांकडून बेस्ट उपक्रमात सुरक्षा रक्षक या पदाकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) पद | : | सुरक्षा रक्षक |
| अनुशेष | : | अनुसूचित जाती-१९, अनुसूचित जमाती-४२, विमुक्त जाती (अ)- २, भज(ब)-५, भजं(क)-४, विमाप्र-२, इमाव-२२, खुला-६४ (अनुशेष-१६०). |
| एकूण अनुशेषा पैकी खेळाडूंसाठी राखीव अनुशेष | : | अनुसूचित जाती-१, अनुसूचित जमाती-२, विजा(अ)/भज(ब)/भज(क)-१ इमाव- १, खुला-३ (एकूण जागा-८) |

२) आवश्यक अर्हता :

उमेदवार सैनिकदलातून मुक्त करण्यात आलेले असल्यास सशस्त्र सेवेतील किमान दोन वर्षाचा अनुभव किंवा केंद्रिय औद्योगिक सुरक्षा दल किंवा केंद्रिय राखीव पोलिस दल किंवा सीमा सुरक्षा दल किंवा राज्य राखीव पोलिस दल किंवा रेल्वे सुरक्षा दल किंवा सशस्त्र पोलिस दल, तसेच राष्ट्रिय सुरक्षा गार्ड (NSG) सेवांतील दोन वर्षाचा अनुभव. इंग्रजी व मराठीचे ज्ञान अत्यावश्यक.

**किंवा**

राष्ट्रीय छात्रसेना (एन.सी.सी.) मध्ये किमान दोन वर्षांच्या अनुभवासह **ए** किंवा **बी** प्रमाणपत्र प्राप्त असलेले नागरीक (civilian)

**राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) उमेदवारांसाठी.**

**शारिरीक पात्रता**:-

१) उंची - १६२ सें.मी. पेक्षा कमी नसावी.
२) वजन - ४५ कि.ग्रॅ. पेक्षा कमी नसावे.
३) छाती - ८० सें.मी. पेक्षा कमी नसावी (न फुगविता)

शारिरीक पात्रता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची ४० गुणांची शारिरीक चाचणी व ६० गुणांची मौखिक चाचणी घेण्यात येईल.

**शारिरीक चाचणी**:-

१) १०० मीटर धावणे
२) १० पुल अप्स्

**खेळांडू उमेदवारांकरीता**

अर्जदार खेळाडूंनी वरील अर्हते व्यतिरिक्त स्टेट स्पोर्टस् असोशिएशन प्रमाणित राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सुवर्ण किंवा रौप्य किंवा कास्य पदक किंवा उच्चस्तरीय स्पर्धा किंवा एन.सी.सी. द्वारा आयोजित राष्ट्रिय स्पर्धेमध्ये विजेते पद प्राप्त केले असले पाहिजे.

३) शैक्षणिक अर्हता :

**माजी सैनिकांसाठी** इंग्रजी व मराठी भाषेचे ज्ञान अत्यावश्यक

**राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.)** उमेदवारांसाठी १२ वी किंवा समतुल्य तत्सम परीक्षा उत्तीर्ण आणि माध्यमिक शालांत (S.S.C.) वा तत्सम

परीक्षा (मराठी विषय घेवून १००/५०) उच्चत्तम किंवा निम्नतर परीक्षा) उत्तीर्ण असणे आवश्यक.

४) वयोमर्यादा : माजी सैनिकांसाठी ०१.०२.२०१५ रोजी १८ ते ४० वर्षे या दरम्यान. (मागासवर्गीय उमेदवारांना ५ वर्षे शिथिल).
राष्ट्रीय छात्र सेनेच्या नागरिक (civilian) उमेदवारांसाठी १८ ते ३३ वर्षे (मागासवर्गीय उमेदवारांना ५ वर्षे शिथिल).

६) वेतन श्रेणी व भत्ते : सर्व वेतनेतर लाभांच्या अंतर्भावासह एकूण प्रारंभिक वेतन दरमहा रुपये १३,५००/- आहे. (वेतन श्रेणी रुपये ५६८०/- ते रुपये १४५३०/-) अन्य लाभ जसे भविष्य निर्वाह निधी/उपदान, मंजुर झाल्यास बोनसऐवजी सानुग्रह अनुदान, रजेतील प्रवासात सहाय्य, रजेचे रोखीकरण, उपक्रमाच्या बसमधून मोफत प्रवासाच्या सुविधा आणि मोफत वैद्यकीय सुविधा, धुलाई भत्ता.

७) प्रशासकीय शुल्क : BEST UNDERTAKING या नावे काढलेला (ना परतावा योग्य) रकमेचा डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर.

| | | |
|---|---|---|
| माजी सैनिक | - | खुल्या प्रवर्गासाठी रुपये १५०/- |
| | | मागासवर्गीय उमेदवारांसाठी रुपये ७५/-. |
| राष्ट्रीय छात्रसेना (N.C.C.) उमेदवारं | - | खुल्या प्रवर्गासाठी रुपये २००/- |
| | | मागासवर्गीय उमेदवारांसाठी रुपये १००/-. |

निवड झालेल्या उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रत्येक अनुशेषाच्या २०% इतकी असेल आणि सदर यादी २ वर्षे वैध राहिल.

वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र, सेवायोजन प्रमाणपत्र, (विजा, भज, विमाप्र, इमाव प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी नॉन क्रिमीलियर प्रमाणपत्र आवश्यक), जात वैधता प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास) इत्यादिच्या समर्थनार्थ प्रमाणपत्रे/कागदपत्रे यांच्या साक्षांकित छायामुद्रांकित प्रती सोबत कोऱ्या कागदावर भरलेले अर्ज आणि "BEST UNDERTAKING" च्या नावे काढलेला (ना परतावा योग्य) रकमेचा डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर <u>२०.०३.२०१५</u> या तारखे पर्यंत उप मुख्य कर्मचारीय व्यवस्थापक, मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१ यांजकडे पोहचतील याची दक्षता घ्यावी.
अपूर्ण भरलेले/उशिरा आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

महाव्यवस्थापक

D:\Anjali\anj\adver(m).doc